कार्यासन - १०

भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# भातगिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८

(१९५८ चा अधिनियम क्रमांक २१)

[१ ऑक्टोबर, १९७८ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Rice-Milling Industry (Regulation) Act, 1958

(Act No. 21 of 1958)

[As in force on 1st October, 1978]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९७९

[किंमत—६० पैसे]

# भातगिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८

## कलमांचा क्रम

कलमे.

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. संघराज्याने नियंत्रण करणे समयोचित असल्याबाबत घोषणा.]

२ क. अधिनियम जम्मू व काश्मीरला लागू करण्याच्या संबंधात अर्थ लावण्याबाबत नियम.

३. व्याख्या.

[३ क. भातघिरट्यांना अधिनियम लागू असणे.

४. लायसन अधिकाऱ्याची नियुक्ती.

५. नवीन किंवा बंद पडलेल्या भातगिरणीबाबत परवाने मंजूर करणे.

६. लायसने देणे.

७. लायसने प्रत्याहृत करणे, निलंबित करणे व विशोधित करणे.

८. भातगिरण्यांवरील विवक्षित निबंध.

९. पाहणी करण्याची शक्ती.

१०. विवक्षित बाबींमध्ये केंद्र शासनाचा निर्णय अंतिम.

११. प्रतिवेदने.

१२. अपिले.]

१३. दंड.

१४. कंपन्यांनी केलेले गुन्हे.

[१४ क. विवक्षित प्रकरणांत शाबितीचा भार.

[१४ ख. संयंत्र व यंत्रसामग्री सरकारजमा करणे.

१५. गुन्ह्यांची दखल घेणे.

१६. न्यायालयांची अधिकारिता.

१७. द्रव्यदंडांसंबंधी विशेष उपबंध.

१८. विशेष प्रकरणांमध्ये सूट देण्याची शक्ती.

१९. शक्तीचे प्रत्यायोजन.

२०. लायसन अधिकारी इ. हे लोकसेवक असणे.

२१. या अधिनियमाखाली केलेल्या कारवाईला संरक्षण.

२२. नियम करण्याची शक्ती.

२३. अन्य कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.

२४. शासनाच्या मालकीच्या भातगिरण्यांना अधिनियम लागू व्हावयाचा नाही.

२५. निरसन व व्यावृत्ती.

# भातगिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८[1]

## (१९५८ चा अधिनियम क्रमांक २१)

[१८ मे, १९५८]

**सर्वसाधारण जनतेच्या हितार्थ भातगिरणी उद्योगाचे विनियमन करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमाला 'भातगिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [३]*** संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [२]दिनांकास तो अंमलात येईल :

[४][परंतु, तो जम्मू व काश्मीर राज्यामध्ये, 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन अधिनियम, १९७२' याच्या प्रारंभ-दिनांकास अंमलात येईल.]

**संघराज्याने नियंत्रण करणे समयोचित असल्याबाबत घोषणा.**

२. लोकहितासाठी संघराज्याने भातगिरणी उद्योग आपल्या नियंत्रणाखाली आणणे समयोचित आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

**[५][अधिनियम जम्मू व काश्मीरला लागू करण्याच्या संबंधात अर्थ लावण्याबाबत नियम.]**

[५][२क. (१) जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अंमलात नसेल अशा कोणत्याही कायद्याचा, या अधिनियमामध्ये जो निर्देश आहे त्याचा अर्थ त्या राज्याच्या संबंधात, त्या राज्यामध्ये कोणताही तदनुरूप कायदा अंमलात असेल तर त्या कायद्याचा निर्देश म्हणून लावण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभासंबंधी किंवा 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन अधिनियम, १९६८' (१९६८ चा २९) याच्या प्रारंभासंबंधी या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधांमध्ये (कलम ३क खेरीजकरून) केलेल्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ जम्मू व काश्मीर राज्याच्या संबंधात, 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन अधिनियम, १९७२' याच्या प्रारंभासंबंधीचा निर्देश म्हणून लावण्यात येईल.

(३) कलम ३क हे जम्मू व काश्मीर राज्याच्या संबंधात, "मात्र फरक एवढाच की," या शब्दांनी सुरू होणारा व "म्हणून लावला जाईल." या शब्दांनी समाप्त होणारा मजकूर वगळता परिणामक होईल.]

**व्याख्या.**

३. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,—

[६][(क) "बंद पडलेली भातगिरणी" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभी अस्तित्वात असलेली, पण अशा प्रारंभापूर्वी सतत एक वर्ष इतका काळ जेथे भात-भरडाईच्या क्रिया चालवलेल्या नाहीत अशी भातगिरणी ; आणि

(दोन) 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन अधिनियम, १९६८' (१९६८ चा २९) याच्या प्रारंभानंतर केव्हाही सतत एक वर्ष इतका काळ जेथे भात-भरडाईच्या क्रिया चालवलेल्या नाहीत अशी भातगिरणी (मग ती अशा प्रारंभापूर्वी स्थापन झालेली असो वा नंतर असो) ;]

(ख) "विद्यमान भातगिरणी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रारंभी भात-भरडाईच्या क्रिया चालवत असलेली भातगिरणी असा आहे ; आणि अशा प्रारंभकाळी अस्तित्वात असलेल्या ज्या भातगिरणीत भात-भरडाईच्या क्रिया चालवल्या जात नाहीत, पण जेथे अशा प्रारंभाच्या मागील एक वर्ष इतक्या काळात केव्हातरी भात-भरडाईच्या क्रिया चालवण्यात आल्या आहेत अशा गिरणीचा यामध्ये समावेश आहे :

---

१. हा अधिनियम १९६२ चा विनियम १२–कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव यांस ; १९६३ चा विनियम ६–कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे दादरा व नगरहवेलीला, आणि १९६८ चा अधिनियम क्रमांक २६–कलम ३ व अनुसूची यांद्वारे पाँडिचेरीला लागू करण्यात आलेला आहे.

२. २२ एप्रिल, १९५९, पहा-जी. एस. आर. ५११, दिनांक २२ एप्रिल, १९५९, पहा **गॅझेट ऑफ इंडिया**, भाग २ रा, विभाग ३(एक), पृष्ठ २२५.

३. १९७२ चा अधिनियम ४७–कलम २ द्वारे गाळले.

४. कित्ता—कलम २ द्वारे घातले.

५. कित्ता—कलम ३ द्वारे घातले.

६. १९६८ चा अधिनियम २९–कलम २ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

¹[परंतु, जर अशा कोणत्याही भातगिरणीत भातभरडाईच्या क्रिया 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन अधिनियम, १९६८' (१९६८ चा २९) याच्या प्रारंभानंतर केव्हाही सतत एक वर्ष इतका काळ चालवण्यात आल्या नाहीत तर, अशी भातगिरणी उक्त एक वर्षाचा कालावधी संपताच विद्यमान भातगिरणी असण्याचे बंद होईल आणि ती बंद पडलेली भातगिरणी असल्याचे मानले जाईल ;]

(ग्) "लायसन अधिकारी" याचा अर्थ, कलम ४ अन्वये तसा अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असा आहे ;

²[(घ्) "गिरणीत भात भरडणे" याच्या व्याकरणिक रूपभेदांसह त्याचा अर्थ, शक्तीच्या साहाय्याने,—

(एक) भातापासून तांदूळ किंवा त्याचे इतर कोणतेही उत्पादन मिळवणे;

(दोन) तांदूळ सडणे,

असा आहे;]

(ङ्) "नवीन भातगिरणी" याचा अर्थ, विद्यमान भातगिरणी किंवा बंद पडलेली भातगिरणी यांहून अन्य गिरणी असा आहे;

(च्) "अधिसूचित आदेश" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेला आदेश असा आहे;

(छ्) "मालक" याचा भातगिरणीच्या संबंधातील अर्थ, भातगिरणीच्या कारभारावर जिचे किंवा ज्याचे अंतिम नियंत्रण असेल ती व्यक्ती किंवा ते प्राधिकरण असा आहे ; आणि जेथे उक्त कारभार हा व्यवस्थापक, व्यवस्थापन-संचालक किंवा व्यवस्थापन-एजंट याच्याकडे सोपवलेला असेल तेथे, असा व्यवस्थापक, व्यवस्थापन-संचालक किंवा व्यवस्थापन-एजंट हा भातगिरणीचा मालक असल्याचे मानण्यात येईल;

³[(छ छ्) "सडणे" याचा तांदळाच्या संबंधातील अर्थ, तांदळाच्या दाण्यावरील कोंडा काढून टाकणे असा आहे ;]

(ज्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहित करण्यात आलेले असा आहे;

(झ्) "भातगिरणी" याचा अर्थ, भातभरडाईच्या क्रिया ज्याद्वारे चालवल्या जातात ते संयंत्र व ती यंत्रसामग्री आणि ज्या वास्तूमध्ये किंवा ज्या वास्तूच्या कोणत्याही भागात त्या क्रिया चालवल्या जातात तिच्या प्रसीमांसह ती वास्तू असा आहे.

⁴[भातघिरटचांना अधिनियम लागू असणे.]

⁴[३क. या अधिनियमाचे उपबंध ज्याप्रमाणे भातगिरण्यांना लागू होतात त्याप्रमाणे ते कोणत्याही पिठाच्या, तेलाच्या, डाळीच्या किंवा अन्य गिरणीशी अथवा पंपसंचाशी संलग्न असलेल्या किंवा त्याबरोबर चालवल्या जाणाऱ्या भातघिरटचांना लागू होतील, मात्र फरक एवढाच की, ते उपबंध अशा भातघिरटचांना लागू करताना, या अधिनियमाच्या प्रारंभाबाबत त्या उपबंधांत असलेल्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन अधिनियम, १९६८' (१९६८ चा २९) याच्या प्रारंभाबाबतचा निर्देश म्हणून लावला जाईल.]

लायसन अधिकाऱ्याची नियुक्ती.

४. केंद्र शासनाला अधिसूचित आदेशाद्वारे,—

(क्) शासनाचे राजपत्रित अधिकारी असलेल्या ज्या व्यक्ती त्याला योग्य वाटतील त्यांची या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी लायसन अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल ; आणि

(ख्) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली लायसन अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती लायसन अधिकाऱ्याला कोणत्या मर्यादांमध्ये वापराव्या लागतील ते निश्चित करता येईल.

नवीन किंवा बंद पडलेल्या भातगिरणीबाबत परवाने मंजूर करणे.

५. (१) कोणत्याही व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला नवीन भातगिरणी स्थापन करण्याचा परवाना मंजूर होण्यासाठी केंद्र शासनाकडे अर्ज करता येईल, आणि कोणत्याही बंद पडलेल्या भातगिरणीच्या मालकाला अशा गिरणीमध्ये भातभरडाईच्या क्रिया पुन्हा सुरू करण्याचा परवाना मंजूर होण्यासाठी तसाच अर्ज करता येईल.

---

१. १९६८ चा अधिनियम २९—कलम २ द्वारे जादा दाखल केले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम २ द्वारे मूळ खंड (घ्) ऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम २ द्वारे घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ३ द्वारे घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज विहित नमुन्यात करावा लागेल, आणि त्यामध्ये भातगिरणीचे स्थळ, तिचा आकार व प्रकार आणि विहित असतील असे अन्य तपशील यांचा अंतर्भाव असेल.

(३) परवाना मंजूर होण्यासाठी करण्यात आलेला असा कोणताही अर्ज मिळाल्यावर जर, तांदळाचा पर्याप्त पुरवठा होण्याची खात्रीलायक तजवीज करण्यासाठी तसे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, पोटकलम (४) आणि पोटकलम (५) च्या उपबंधांच्या अधीनतेने, परवाना मंजूर करून त्यात त्याला, किती कालावधीच्या आत ती गिरणी स्थापन करावयाची किंवा, प्रकरणपरत्वे, भात-भरडाईच्या क्रिया पुन्हा सुरू करावयाच्या ते आणि यासंबंधात कोणतेही नियम करण्यात आले असतील तर त्यांनुसार [1][ज्या शर्ती लादणे स्वतःला योग्य वाटेल अशा अन्य शर्ती (अपव्यय टाळणे, कमाल उत्पादन मिळवणे व प्रत सुधारणे यांसाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे, विद्यमान यंत्रसामग्रीची सुधारणा, विद्यमान यंत्रसामग्रीचे प्रतिस्थापन, गिरणीतील भातभरडाईच्या सुधारित पद्धतींचा अवलंब यांबाबतच्या शर्ती धरून)] विनिर्दिष्ट करता येतील.

(४) पोटकलम (३) खाली परवाना मंजूर करण्यापूर्वी केंद्र शासन अर्जाबाबत [विहित रीतीने सर्वांगीण व संपूर्ण चौकशी करवील आणि पुढील गोष्टींचा यथायोग्य विचार करील :—

(क) त्या स्थानिक भागात चालू असलेल्या भातगिरण्यांची संख्या ;

(ख) त्या स्थानिक भागातील भाताची उपलब्धता ;

(ग) जिच्याबाबत परवान्यासाठी अर्ज केला आहे त्या भातगिरणीसाठी वीज व पाणी-पुरवठा यांची उपलब्धता ;

(घ) जिच्याबाबत परवान्यासाठी अर्ज करण्यात आला आहे ती भातगिरणी घिरटी यंत्रपद्धतीची आहे की, भरडाई यंत्रपद्धतीची आहे की, भरडाई-घिरटी अशी संयुक्त प्रकारची आहे की काय ;

(ङ) जिच्याबाबत परवान्यासाठी अर्ज करण्यात आला आहे त्या भातगिरणीचे काम चालू झाल्यामुळे त्या स्थानिक भागात मोठ्या प्रमाणावर बेकारी निर्माण होईल की काय ;

(च) विहित केले असतील असे इतर तपशील.

[2][(५) (क) या अधिनियमाखाली परवाना मंजूर करताना (मग तो नवीन भातगिरणी स्थापन करण्यासाठी असो वा बंद पडलेल्या भातगिरणीत भातभरडाईच्या क्रिया पुन्हा चालू करण्यासाठी असो) केंद्र शासन,—

(एक) अन्य प्रत्येक अर्जदारापेक्षा शासकीय कंपनीला अथवा शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील निगमाला ;

(दोन) शासकीय कंपनी अथवा शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या नियंत्रणाखालील निगम नसलेल्या अशा अन्य प्रत्येक अर्जदारापेक्षा शेतकरी सहकारी संस्थेला,

प्राधान्य देईल—मग अशा अन्य अर्जदाराने बंद पडलेल्या भातगिरणीमध्ये भातभरडाईच्या क्रिया पुन्हा सुरू करण्यासाठी परवाना मंजूर व्हावा यासाठी अर्ज केला असला तरी हरकत नाही.

(ख) खंड (क) च्या उपबंधांच्या अधीनतेने, या कलमाखाली परवाना मंजूर करताना केंद्र शासन नवीन भातगिरणीपेक्षा बंद पडलेल्या भातगिरणीला अग्रक्रम देईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात,—

(एक) "सहकारी संस्था" याचा अर्थ, 'सहकारी संस्था अधिनियम, १९१२' (१९१२ चा २) किंवा कोणत्याही राज्यात त्या त्या काळी अंमलात असलेला सहकारी संस्थांसंबंधीचा अन्य कोणताही कायदा याखाली नोंदणी करण्यात आलेली किंवा नोंदणी करण्यात आल्याचे मानली जाणारी संस्था असा आहे आणि "शेतकरी सहकारी संस्था" याचा अर्थ, जिच्या सदस्यांमध्ये शेतकऱ्यांचा समावेश असून जिच्यातील मतदानविषयक अधिकार हे तिचे नियम व उपविधी यांनुसार पुढील वर्गांत मोडणाऱ्या सदस्यांपुरते मर्यादित केले आहेत ती सहकारी संस्था असा आहे, ते वर्ग असे :—

(क) शेतकरी,

(ख) राज्य शासने,

(ग) 'भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४' (१९३४ चा २) कलम २–खंड (२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे प्राथमिक कृषि पत संस्था;

---

१. १९६८ चा अधिनियम २९–कलम ४ द्वारे "ज्या शर्ती लादणे स्वतःला योग्य वाटेल अशा अन्य शर्ती" या मजकुराऐवजी घातला (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ४ द्वारे मूळ पोटकलम (५) ऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

(दोन) "शासकीय कंपनी" याला 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) यामध्ये नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ आहे.]

(६) या कलमान्वये मंजूर करण्यात आलेला परवाना, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधी-पर्यंत किंवा एखाद्या प्रकरणात केंद्र शासनाला योग्य वाटेल तितक्या वाढीव कालावधीपर्यंत [१][ विधिग्राह्य ] असेल :

[२][ परंतु, पोटकलम (३) खाली जिच्याबाबतीत परवाना मंजूर करण्यात आला असेल अशा गिरणीमध्ये 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन अधिनियम, १९६८' (१९६८ चा २९) याच्या प्रारंभानंतर केव्हाही सतत एक वर्ष इतका काळ भातभरडाईच्या क्रिया चालवण्यात आल्या नसतील तर, असा परवाना उक्त एक वर्षाचा कालावधी संपल्यावर विधिग्राह्य राहणार नाही आणि त्या गिरणीमध्ये भातभरडाईच्या क्रिया पुन्हा सुरू करण्यासाठी नवीन परवाना लागेल.]

**लायसने देणे.** ६. (१) विद्यमान भातगिरणीच्या किंवा जिच्याबाबत [३][ कलम ५ अन्वये दिलेला परवाना परिणामक असेल ] अशा भातगिरणीच्या कोणत्याही मालकाला त्या भातगिरणीमध्ये भातभरडाईच्या क्रिया चालवण्याचे लायसन मंजूर होण्यासाठी लायसन अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज विहित नमुन्यात करावा लागेल आणि त्यामध्ये भात-गिरणीचे स्थळ, तिचा आकार व प्रकार आणि विहित असतील असे अन्य तपशील यांचा अंतर्भाव असेल.

(३) लायसन मंजूर होण्यासाठी करण्यात आलेला असा कोणताही अर्ज मिळाल्यावर लायसन अधिकारी, विहित असतील अशा शर्तींवर [४][(अपव्यय टाळणे, कमाल उत्पादन मिळवणे व प्रत सुधारणे यांसाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे, विद्यमान यंत्रसामग्रीची सुधारणा, विद्यमान यंत्रसामग्रीचे प्रतिस्थापन, गिरणीतील भातभरडाईच्या सुधारित पद्धतींचा अवलंब यांबाबतच्या शर्ती आणि तांदूळ सडण्याबाबतच्या शर्ती धरून)], विहित अशी फी भरण्यात आल्यावर आणि शर्तींच्या रीतसर पालनासाठी प्रतिभूती म्हणून विहित केली असल्यास तशी रक्कम अनामत ठेवण्यात आल्यावर लायसन मंजूर करील.

[५][(४) या कलमाखाली मंजूर करण्यात आलेले लायसन त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत विधिग्राह्य असेल आणि विहित असेल अशा कालावधीसाठी आणि अशा फीचा भरणा केल्यावर व अशा शर्तींवर (अपव्यय टाळणे, कमाल उत्पादन मिळवणे व प्रत सुधारणे यांसाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे, विद्यमान यंत्रसामग्रीची सुधारणा, विद्यमान यंत्रसामग्रीचे प्रतिस्थापन व गिरणीतील भातभरडाईच्या सुधारित पद्धतींचा अवलंब यांबाबतच्या शर्ती धरून) त्याचे वेळोवेळी नूतनीकरण करता येईल :

परंतु, पोटकलम (३) खाली जिच्याबाबतीत लायसन मंजूर करण्यात आले असेल अशा गिरणीमध्ये 'भातगिरणी उद्योग (विनियमन) विशोधन, अधिनियम, १९६८' (१९६८ चा २९) याच्या प्रारंभानंतर केव्हाही सतत एक वर्ष इतका काळ भातभरडाईच्या क्रिया चालवण्यात आल्या नसतील तर, असे लायसन उक्त एक वर्षाचा कालावधी संपल्यावर विधिग्राह्य राहणार नाही आणि त्या गिरणीमध्ये भातभरडाईच्या क्रिया पुन्हा सुरू करण्यासाठी नवीन लायसन लागेल.]

**लायसने प्रत्याहृत करणे, निलंबित करणे व विशोधित करणे.** ७. (१) जर लायसन अधिकाऱ्याकडे याबाबत करण्यात आलेल्या निर्देशनावरून किंवा अन्यथा त्याची अशी खात्री झाली की,—

(क) कलम ६ अन्वये मंजूर केलेले लायसन कोणत्याही सारभूत तथ्याबाबत अपवेदन करून मिळवलेले आहे, किंवा

(ख) वाजवी कारण नसताना, लायसनधारक ज्या शर्तींवर लायसन मंजूर करण्यात आलेले आहे त्यांचे अनुपालन करण्यास चुकला आहे अथवा त्याने या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधांचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे व्यतिक्रमण केले आहे,

तर, लायसनधारकाला कारण दाखवण्याची संधी दिल्यानंतर लायसन अधिकाऱ्याला लायसन प्रत्याहृत करता येईल किंवा निलंबित करता येईल अथवा ज्या शर्तींवर लायसन मंजूर करण्यात आले असेल त्यांच्या रीतसर पालनासाठी प्रतिभूती म्हणून काही रक्कम अनामत ठेवलेली असल्यास ती किंवा तिचा कोणताही भाग समपहृत करता येईल, मात्र, लायसनधारक या अधिनियमाखाली ज्या अन्य कोणत्याही दंडाला पात्र होईल त्याला यामुळे बाध येणार नाही.

(२) या संबंधात जे कोणतेही नियम करण्यात येतील त्यांच्या अधीनतेने, लायसन अधिकारी कलम ६ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या लायसनामध्ये बदल करू शकेल किंवा ते विशोधित करू शकेल.

---

१. १९६८ चा अधिनियम २९—कलम ४ द्वारे "परिणामक" या शब्दाऐवजी घातले.

२. कित्ता—कलम ४ द्वारे जादा दाखल केले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ४ द्वारे "कलम ५ अन्वये परवाना देण्यात आलेला असेल" या मजकुराऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ५ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम ५ द्वारे मूळ पोटकलम (४) ऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

८. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकरण कलम ५ खाली मंजूर करण्यात आलेल्या परवान्याखेरीज व त्याला अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही कोणतीही नवीन भातगिरणी स्थापन करणार नाही. **भातगिरण्यांवरील विवक्षित निर्बंध.**

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, कोणताही भातगिरणीचा मालक कलम ६ खाली मंजूर करण्यात आलेल्या लायसनाखेरीज व तिला अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही भातभरडाईच्या क्रिया चालवणार नाही :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट एखाद्या विद्यमान भातगिरणीला केंद्र शासनाने यासंबंधात अधिसूचित आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केला असेल अशा कालावधीपर्यंत लागू होणार नाही.

(३) कोणीही भातगिरणीचा मालक---

(क) जर तिच्याबाबत कलम ६ खाली लायसन मंजूर करण्यात आलेले असेल तर, [1][ लायसनाच्या विधिग्राह्यतेचा कालावधी संपल्यानंतर ] त्या गिरणीमध्ये भातभरडाईच्या क्रिया चालवणार नाही;

(ख) जर तिच्याबाबत कलम ७ खाली लायसन प्रत्याहृत किंवा निलंबित करण्यात आले असेल तर, प्रत्याहरणानंतर किंवा, प्रकरणपरत्वे, लायसन ज्या कालावधीपर्यंत निलंबित करण्यात आले असेल त्या कालावधीत त्या गिरणीत भातभरडाईच्या क्रिया चालवणार नाही;

(ग) जर तिच्याबाबत कलम ६ खाली लायसन मंजूर करण्यात आले असेल तर, अशा सबंध भातगिरणीचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे स्थळ बदलणार नाही;

(घ) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीखेरीज भातगिरणीचा कोणत्याही प्रकारे विस्तार करणार नाही :

[2][ परंतु---

(एक) असा विस्तार, भातगिरणीच्या बाबतीत या अधिनियमाखाली मंजूर केलेल्या परवान्याच्या किंवा लायसनाच्या अटींना व शर्तींना अनुसरून असेल त्या बाबतीत; किंवा

(दोन) जर भातगिरणीच्या यंत्रसामग्रीच्या कोणत्याही जुन्या भागांच्या जागी नवे भाग बसवल्यामुळे केवळ भातगिरणीच्या उत्पादनक्षमतेमध्ये वाढ होणार नसेल तर प्रतिस्थापनासाठी अशी कोणतीही परवानगी आवश्यक असणार नाही. ]

**स्पष्टीकरण.**---या पोटकलमाच्या खंड (क) च्या प्रयोजनार्थ, जर लायसनाच्या नूतनीकरणासाठी केलेला अर्ज लायसन अधिकाऱ्यासमोर प्रलंबित असेल तर, त्याच्या विधिग्राह्यतेचा कालावधी संपला असल्याचे मानण्यात येणार नाही.

९. कोणत्याही भातगिरणीची स्थिती अजमावण्यासाठी किंवा तिचे काम तपासण्यासाठी अथवा या अधिनियमामध्ये किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी, लायसन अधिकाऱ्याला किंवा केंद्र शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला --- **पाहणी करण्याची शक्ती.**

(क) कोणत्याही भातगिरणीमध्ये प्रवेश करून तिची पाहणी करण्याचा ;

(ख) कोणत्याही भातगिरणीचे नियंत्रण करणाऱ्या किंवा तिच्या संबंधात नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील कोणताही दस्तऐवज, पुस्तक, नोंदपुस्तक, किंवा अभिलेख हजर करण्याचा आदेश देण्याचा; आणि

(ग) कोणत्याही भातगिरणीचे नियंत्रण करणाऱ्या किंवा तिच्या संबंधात नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीची तपासणी करण्याचा,

अधिकार असेल.

१०. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ जर--- **विवक्षित बाबींमध्ये केंद्र शासनाचा निर्णय अंतिम.**

(क) भातगिरणीचा विस्तार झाला आहे की काय, किंवा

(ख) भातगिरणीच्या यंत्रसामग्रीचे कोणतेही जुने भाग बदलून त्या जागी नवे भाग प्रतिस्थापित केल्यामुळे त्या भातगिरणीच्या उत्पादनक्षमतेमध्ये वाढ झाली आहे की काय,

असा कोणताही प्रश्न उद्भवला तर, त्या भातगिरणीच्या मालकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, केंद्र शासनाला त्या प्रश्नाचा निर्णय करता येईल आणि केंद्र शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**११.** प्रत्येक भातगिरणी-मालक विहित असतील अशी भातगिरणीच्या कारभारासंबंधीची प्रतिवेदने विहित अशा नमुन्यांत केंद्र शासनाला सादर करील. **प्रतिवेदने.**

---

१. १९६८ चा अधिनियम २९--कलम ६ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता---कलम ६ द्वारे पूर्वीच्या परंतुकाऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

अपिले. १२. (१) लायसन अधिकाऱ्याच्या कलम ६ किंवा कलम ७ खालील निर्णयामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, तो निर्णय तिला कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत एखाद्या अपील अधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल व तो अधिकारी म्हणजे केंद्र शासनाने यासंबंधात नाम-निर्देशित केलेली व्यक्ती असेल :

परंतु, अपीलकर्ता पुरेशा कारणामुळे वेळेवर अपील करू शकला नाही याबाबत अपील अधिकाऱ्याची खात्री झाली तर, त्याला उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर अपील विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) पोटकलम (१) खाली अपील मिळाल्यावर, अपील अधिकारी अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर शक्य तितक्या त्वरेने अपिलाचा निकाल करील.

दंड. १३. [1][ (१) जर कोणत्याही व्यक्तीने कलम ८ किंवा कलम १८ चे पोटकलम (२) याच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले किंवा व्यतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला किंवा त्याच्या व्यतिक्रमणास अपप्रेरणा दिली तर, ती व्यक्ती सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस, आणि व्यतिक्रमण चालू राहिल्यास त्या बाबतीत, अशा पहिल्या व्यतिक्रमणाबद्दल दोषसिद्धी झाल्यानंतर असे व्यतिक्रमण चालू राहील त्या प्रत्येक दिवसामागे पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडास पात्र होईल :

परंतु, असे व्यतिक्रमण, प्रयत्न किंवा अपप्रेरण कलम ८ चे पोटकलम (१) अथवा पोटकलम (२) अथवा पोटकलम (३) चा खंड (क) किंवा खंड (ख), अगर कलम १८ चे पोटकलम (२) याच्याशी संबंधित असेल त्याबाबतीत, ती व्यक्ती एक महिन्यापेक्षा कमी असणार नाही इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल. ]

(२) जर कोणत्याही व्यक्तीने,——

(क) या अधिनियमानुसार किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही आदेशानुसार कोणतेही निवेदन देणे किंवा कोणतीही माहिती पुरविणे आवश्यक असताना, जे महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटे आहे आणि ते खोटे असल्याचे तिला माहीत आहे किंवा तसे समजण्यास तिला कारण आहे अथवा जे खरे आहे असा तिचा समज नाही असे कोणतेही निवेदन दिले किंवा अशी कोणतीही माहिती पुरवली तर ; किंवा

(ख) या अधिनियमाखाली राखावी लागणारी किंवा सादर करावी लागणारी कोणतीही चोपडी, हिशेब, अभिलेख, अधिकथन, प्रतिवेदन किंवा अन्य दस्तऐवज यांमध्ये पूर्वोक्त असे कोणतेही निवेदन केले तर ; किंवा

(ग) ज्याचे व्यतिक्रमण हे या पोटकलमाखाली शिक्षापात्र केले असेल अशा कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण केले तर,

ती व्यक्ती तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

कंपन्यानी केलेले गुन्हे. १४. (१) जर या अधिनियमाखाली गुन्हा करणारी व्यक्ती ही एखादी कंपनी असेल तर, गुन्हा करण्यात आला त्यावेळी कामकाज-चालनाबाबत जो व्यक्ती कंपनीची हुकूमतदार होती किंवा त्याबाबत तिला जी जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती व त्याचप्रमाणे ती कंपनी गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तदनुसार शिक्षा मिळण्यास ती पात्र ठरेल:

परंतु, गुन्हा आपल्या नकळत घडला किंवा असा गुन्हा घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी आपण सर्व-प्रकारे वाजवी तत्परता दाखवली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमामध्ये उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेला पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमा-खालील गुन्हा केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने गुन्हा करण्यात आला आहे किंवा त्याच्याकडून झालेल्या हलगर्जीपणाशी त्या गुन्ह्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे हे शाबीत करण्यात आले असेल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हादेखील त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तदनुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.** ——या कलमाच्या प्रयोजनार्थ,——

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे आणि यामध्ये पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा समावेश आहे ; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

---

१. १९६८ चा अधिनियम २९—कलम ७ द्वारे पोटकलम (१) ऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

[१][१४क. जेव्हा भात, तूस, तांदूळ किंवा कण्या ह्या गिरणीच्या वास्तूमधून मिळवण्यात येतात तेव्हा, मालकाने विरुद्ध शाबीत केले नाही तर, त्या गिरणीमध्ये भातभरडाईच्या क्रिया चालवल्या जातात असे गृहीत धरण्यात येईल.] [१][विवक्षित प्रकरणांत शाबितीचा भार.]

[१][१४ख. जेव्हा कलम ८ किंवा कलम १८–पोटकलम (२) याच्या कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण केल्याबद्दल एखादी व्यक्ती दोषी ठरवण्यात आली असेल तेव्हा, अशा व्यक्तीला दोषी ठरवणारे न्यायालय, अशा उपबंधाचे व्यतिक्रमण करून ज्याच्या साहाय्याने भातभरडाईच्या क्रिया चालवण्यात आल्या ते संयंत्र व यंत्रसामग्री सरकारजमा करण्याचा आदेश देऊ शकेल : [१][संयंत्र व यंत्रसामग्री सरकारजमा करणे.]

परंतु, अशी व्यक्ती जेव्हा दुसऱ्या किंवा नंतरच्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरवण्यात येईल तेव्हा, न्यायालय असे संयंत्र व यंत्रसामग्री सरकारजमा करण्याचा आदेश देईल.]

१५. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याच्या घटकतथ्यांचा लेखी अहवाल लायसन अधिकाऱ्याकडून अथवा केंद्र शासनाने किंवा लायसन अधिकाऱ्याने यासंबंधात रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून मिळाल्याखेरीज कोणतेही न्यायालय अशा गुन्ह्याची दखल घेणार नाही. गुन्ह्यांची दखल घेणे.

१६. इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही. न्यायालयांची अधिकारिता.

१७. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५)––कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याने किंवा कोणत्याही इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्याबद्दल दोषी ठरवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला दोन हजार रुपयांपेक्षा अधिक द्रव्यदंडाचा आदेश देणे कायदेशीर होईल. द्रव्यदंडांसंबंधी विशेष उपबंध.

१८. (१) कोणत्याही क्षेत्रामध्ये तांदळाचा पर्याप्त पुरवठा होण्यासाठी खात्रीलायक तजवीज करण्याची गरज किंवा तेथील प्रचलित परिस्थिती लक्षात घेता जर, त्या क्षेत्रातील भातगिरण्यांना किंवा एखाद्या वर्गातील भातगिरण्यांना या अधिनियमाचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही उपबंध लागू करणे लोकहिताचे होणार नाही असे केंद्र शासनाचे मत असेल तर, अधिसूचित आदेशाद्वारे ते त्या क्षेत्रातील सर्व भातगिरण्यांना किंवा आदेशामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा वर्गाच्या भातगिरण्यांना त्याला योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत आणि ज्या शर्ती लादणे त्यास योग्य वाटेल अशा शर्तींवर या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांच्या अथवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल. विशेष प्रकरणांमध्ये सूट देण्याची शक्ती.

(२) जर पोटकलम (१) खालील सूट देणारा कोणताही अधिसूचित आदेश रद्द करण्यात आला तर, कोणताही भातगिरणी-मालक सूट रद्द करणाऱ्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा कालावधी संपल्यानंतर, त्याला कलम ६ खाली लायसन मंजूर झाल्याखेरीज किंवा त्याला अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, भातगिरणीमध्ये भातभरडाईची क्रिया चालवणार नाही.

१९. केंद्र शासन अधिसूचित आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, या अधिनियमाखाली त्यास वापरता येण्यासारख्या कोणत्याही शक्ती, निदेशात विनिर्दिष्ट असेल–– शक्तींचे प्रत्यायोजन.

(क) असा केंद्र शासनाला दुय्यम असलेला अधिकारी किंवा प्राधिकरण, किंवा

(ख) असे राज्य शासन अथवा असा राज्य शासनाला दुय्यम असलेला अधिकारी किंवा प्राधिकरण,

यालाही निदेशात विनिर्दिष्ट असतील अशा बाबींच्या संबंधात व विनिर्दिष्ट अशा काही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने वापरता येण्यासारख्या असतील.

२०. लायसन अधिकारी आणि या अधिनियमाद्वारे जी जी व्यक्ती तिला नेमून दिलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी रीतसर प्राधिकृत केलेली असेल ती प्रत्येक व्यक्ती, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)––कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. लायसन अधिकारी, इ. हे लोकसेवक असणे.

२१. (१) हा अधिनियम अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश यास अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल [२][कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण याच्याविरुद्ध] कोणताही दावा, अभियोग किंवा इतर वैध कार्यवाही होऊ शकणार नाही. या अधिनियमाखाली केलेल्या कारवाईला संरक्षण.

(२) हा अधिनियम अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश यास अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

---

१. १९६८ चा अधिनियम २९–कलम ८ द्वारे घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता––कलम ९ द्वारे "कोणत्याही व्यक्तीविरुद्ध" याऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

नियम करण्याची शक्ती.

२२. (१) केंद्र शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने, नियम करता येतील.

(२) विशेषत:, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क्) कलम ६ खाली परवाना मंजूर होण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना आणि त्यामध्ये अंतर्भूत असावयाचा असा तपशील ;

(ख्) परवान्यासाठी करावयाच्या अर्जाबाबत कशा रीतीने चौकशी करावयाची ती रीत आणि परवाना मंजूर करताना किंवा नाकारताना विचारात घ्यावयाच्या बाबी ;

[१][(ख् ख्) कलम ५ खालील परवान्याचा नमुना आणि ज्यांच्या अधीनतेने परवाना मंजूर करता येईल त्या शर्ती (भातगिरण्यांच्या विद्यमान यंत्रसामग्रीची सुधारणा, विद्यमान यंत्र-सामग्रीचे प्रतिस्थापन आणि गिरणीतील भातभरडाईच्या सुधारित पद्धतींचा अवलंब यांबाबतच्या शर्ती धरून), आणि अशा शर्तींचे अनुपालन किती मुदतीच्या आत करावयाचे ती मुदत ; ]

(ग्) भातगिरणीबाबत लायसन मंजूर होण्यासाठी किंवा त्याच्या नूतनीकरणासाठी करा-वयाच्या अर्जाचा नमुना आणि त्यामध्ये अंतर्भूत असावयाचा तपशील ;

(घ्) कलम ६ खाली जे मंजूर करता येईल किंवा ज्याचे नूतनीकरण करता येईल अशा लायसनाचा नमुना आणि [२][भातगिरण्यांच्या विद्यमान यंत्रसामग्रीची सुधारणा, विद्यमान यंत्र-सामग्रीचे प्रतिस्थापन आणि गिरणीतील भातभरडाई व तांदूळ सडणे यांच्या सुधारित पद्धतींचा अवलंब यांबाबतच्या शर्ती धरून,] ज्यांच्या अधीनतेने लायसन मंजूर करता येईल किंवा त्याचे नूतनीकरण करता येईल त्या शर्ती, अशा शर्तींचे अनुपालन किती मुदतीच्या आत करावयाचे ती मुदत, लायसनाच्या मंजुरीसाठी किंवा नूतनीकरणासाठी आकारावयाची फी आणि अशा शर्तींच्या पालनाकरता प्रतिभूती म्हणून कोणत्याही रकमेची ठेव ;

(ङ्) कलम ७ च्या पोटकलम (२) खाली लायसनामध्ये केव्हा बदल किंवा विशोधन करता येईल ती परिस्थिती ;

(च्) भातगिरणीसंबंधीची प्रतिवेदने मालकाने सादर करणे आणि अशी प्रतिवेदने जशी व ज्यांच्याकडे सादर करता येतील ते नमुने व ती प्राधिकरणे आणि भातगिरणीसंबंधी कोणतीही माहिती किंवा आकडेवारी गोळा करणे ;

(छ्) कलम १२ खाली कोणत्या स्वरूपात व कोणत्या रीतीने अपिले सादर करता येतील ते आणि अपिलांचा निकाल करताना अपील अधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ज्) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेल्या कोणत्याही नियमामध्ये, त्याच्या व्यतिक्रमणाचे कृत्य हे कलम १३ च्या पोटकलम (२) खाली शिक्षापात्र ठरेल असा उपबंध करता येईल.

[३][(४) या कलमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला गेला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्या-बाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरण-परत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यी-करणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

अन्य कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.

२३. या अधिनियमाचे उपबंध त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही केंद्रीय अधि-नियमाच्या व्यतिरिक्त असतील, त्यास न्यूनकारी असणार नाहीत.

---

१. १९६८ चा अधिनियम २९—कलम १० द्वारे घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १० द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम १० द्वारे मूळ पोटकलम (४) ऐवजी घातले (१ मे, १९७० रोजी व तेव्हापासून).

२४. या अधिनियमाचे उपबंध, शासनाच्या मालकीच्या कोणत्याही भातगिरणीला लागू होणार नाहीत.

**शासनाच्या मालकीच्या भातगिरण्यांना अधिनियम लागू व्हावयाचा नाही.**

२५. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी जर, हा अधिनियम विस्तरित असलेल्या अशा कोणत्याही राज्यात, त्या राज्यातील भातगिरण्यांचे विनियमन किंवा नियंत्रण करण्यासंबंधीचा कोणताही कायदा किंवा आदेश अंमलात असेल तर, तो कायदा किंवा आदेश निरसित ठरेल.

**निरसन व व्यावृत्ती.**

(२) असे निरसन झाले असले तरीही, याद्वारे निरसित करण्यात आलेल्या अशा कोणत्याही कायद्याखाली किंवा आदेशाखाली कोणत्याही विद्यमान भातगिरणीबाबत मंजूर करण्यात आलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र, परवाना किंवा लायसन या अधिनियमाच्या उपबंधांखाली अशा भातगिरणीला लायसन देण्यासाठी कलम ८ च्या पोट-कलम (२) च्या परंतुकान्वये मंजूर करण्यात येईल तितक्या कालावधीपुरते अंमलात असल्याचे चालू राहील आणि शंकानिवारणार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०) याचे उपबंध केंद्रीय अधिनियमाद्वारे अधिनियमितीच्या होणाऱ्या निरसनाच्या संबंधात जसे लागू होतात तसेच ते अशा निरसनाच्या संबंधात लागू होतील.

## THE RICE-MILLING INDUSTRY (REGULATION) ACT, 1958

## भातगिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| aggrieved | नाराज झालेला | [S. 12(*1*)] |
| amendment | विशोधित करणे | [S. 7-m.n.] |
| association of individuals | व्यक्तिसंघ | [S. 14-expl.(*a*)] |
| attributable | कारणसंबंध जोडता येण्यासारखा | [S. 14(*2*)] |
| body corporate | निगम-निकाय | [S. 14-expl.(*a*)] |
| bran | कोंडा | [S. 3 (*gg*)] |
| broken rice | कण्या | [S. 14A] |
| burden of proof | शाबितीचा भार | [S. 14A-m.n.] |
| carry on rice-milling operations | भातभरडाईच्या क्रिया चालवणे | [S. 8(*2*)] |
| cognizance | दखल घेणे | [S. 15-m.n.] |
| company | कंपनी | [S. 14-expl.(*a*)] |
| confiscation | सरकारजमा करणे | [S. 14B] |
| connivance | मूकानुमती | [S. 14(*2*)] |
| co-operative society | सहकारी संस्था | [S. 5 (*5*)-expl.(i)] |
| defunct rice-mill | बंद पडलेली भातगिरणी | [S. 3(*a*)] |
| delegation | प्रत्यायोजन | [S. 19-m.n.] |
| deposit as security | प्रतिभूती म्हणून अनामत ठेवणे | [S. 7(*1*)] |
| director | संचालक | [S. 14-expl.(*b*)] |
| dispose of | –चा निकाल करणे | [S. 12(*2*)] |
| eliminate waste | अपव्यय टाळणे | [S. 5(*3*)] |
| entertain an appeal | अपील विचारार्थ स्वीकारणे | [S. 12(*1*)-proviso] |
| essential fact | सारभूत तथ्य | [S. 7(*1*)(*a*)] |
| except under and in accordance with | –खाली आणि – ला अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही | [S. 8(*1*)] |
| existing rice-mill | विद्यमान भातगिरणी | [S. 3(*b*)] |
| expeditiously | त्वरेने | [S. 12(*2*)] |
| farmers' co-operative society | शेतकरी सहकारी संस्था | [S. 5(*5*)-expl.(i)] |
| firm | पेढी | [S. 14-expl.(*a*)] |
| forfeit | समपहरण करणे | [S. 7 (*1*)] |
| full and complete investigation | सर्वांगीण व संपूर्ण चौकशी | [S. 5(*4*)] |
| Government company | शासकीय कंपनी | [S. 5(*5*)-expl.(ii)] |
| grant of permit | परवाना मंजूर करणे | [S. 5 (*1*)] |
| huller | घिरटी यंत्र | [S. 5(*4*)(*d*)] |
| husk | तूस | [S. 14A] |
| in addition to | –च्या व्यतिरिक्त | [S. 23] |
| in charge | हुकूमतदार | [S. 14] |
| in derogation of | –स न्यूनकारी | [S. 23] |
| inspection | पाहणी करणे | [S. 9-m.n.] |
| kernel of rice | तांदळाचा दाणा | [S. 3 (*gg*)] |
| levy | आकारणे | [S. 22(*2*)(*d*)] |
| licence | लायसन | [S. 6-m.n.] |
| licensing officer | लायसन अधिकारी | [S. 3(*c*)] |
| locality | स्थानिक भाग | [S. 5(*4*)(*a*)] |
| location | स्थळ | [S. 5 (*2*)] |
| machinery | यंत्रसामग्री | [S. 3(*i*)] |
| manager | व्यवस्थापक | [S. 3(*g*)] |
| managing agent | व्यवस्थापन एजंट | [S. 3(*g*)] |
| managing director | व्यवस्थापन संचालक | [S. 3(*g*)] |
| milling rice | गिरणीत भात भरडणे | [S. 3(*d*)] |
| misrepresentation | अपवेदन | [S. 7(*1*)(*a*)] |
| neglect | हलगर्जीपणा | [S. 14(*2*)] |
| new rice-mill | नवीन भातगिरणी | [S. 3(*e*)] |
| notified order | अधिसूचित आदेश | [S. 3(*f*)] |
| owner | मालक | [S. 3(*g*)] |

| | | |
|---|---|---|
| paddy | भात | [S. 3(*d*)] |
| permit | परवाना | [S. 5(*1*)] |
| plant | संयंत्र | [S. 3(*i*)] |
| polishing rice | तांदूळ सडणे | [S. 3(*d*)] |
| precincts | प्रसीमा | [S. 3(*i*)] |
| premises | वास्तू | [S. 3(*i*)] |
| prescribed | विहित | [S. 3(*h*)] |
| primary agricultural credit society | प्राथमिक कृषि पत संस्था | [S. 5(*5*)-expl.(i)(*c*)] |
| productive capacity | उत्पादनक्षमता | [S. 8(*3*)(*d*)-proviso] |
| public servant | लोकसेवक | [S. 20-m.n.] |
| pumping set | पंचसंच | [S. 3A] |
| recover | मिळवणे | [S. 14A] |
| reference | निर्देशन | [S. 7] |
| renew | नूतनीकरण करणे | [S. 6(*4*)] |
| replacement | प्रतिस्थापन | [S. 5(*3*)] |
| returns | प्रतिवेदने | [S. 11-m.n.] |
| revocation | प्रत्याहृत करणे | [S. 7-m.n.] |
| rice | तांदूळ | [S. 14A] |
| rice-huller | भातघिरटी | [S. 3A] |
| rice-mill | भातगिरणी | [S. 3(*i*)] |
| rice-milling | गिरणीतील भातभरडाई | [S. 6(*3*)] |
| rice-milling industry | भातगिरणी उद्योग | [S. 2] |
| rice-milling operations | भातभरडाईच्या क्रिया | [S. 3(*a*)(*i*)] |
| sheller | भरडाई यंत्र | [S. 5(*4*)(*d*)] |
| successive sessions | क्रमवर्ती सत्रे | [S. 22(*4*)] |
| suspension | निलंबित करणे | [S. 7-m.n.] |
| validity | विधिग्राह्यता | [S. 8-expl.] |

# भातगिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८

# THE RICE-MILLING INDUSTRY (REGULATION) ACT, 1958

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिसूचित आदेश | notified order | [S. 3(*f*)] |
| अपवेदन | misrepresentation | [S. 7(*1*)(*a*)] |
| अपव्यय टाळणे | eliminate waste | [S. 5(*3*)] |
| अपील विचारार्थ स्वीकारणे | entetain an appeal | [S. 12(*1*)-proviso] |
| आकारणे | levy | [S. 22(*2*)(*d*)] |
| उत्पादनक्षमता | productive capacity | [S. 8(*3*)(*d*)-proviso] |
| कण्या | broken rice | [S. 14A] |
| कंपनी | company | [S. 14-expl.(*a*)] |
| कारणसंबंध जोडता येण्यासारखा | attributable | [S. 14(*2*)] |
| कोंडा | bran | [S. 3(*gg*)] |
| क्रमवर्ती सत्रे | successive sessions | [S. 22(*4*)] |
| –खाली आणि–ला अनुसरून असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही | except under and in accordance with | [S. 8(*1*)] |
| गिरणीत भात भरडणे | milling rice | [S. 3(*d*)] |
| गिरणीतील भातभरडाई | rice-milling | [S. 6(*3*)] |
| घिरटी यंत्र | huller | [S. 5(*4*)(*d*)] |
| –चा निकाल करणे | dispose of | [S. 12(*2*)] |
| –च्या व्यतिरिक्त | in addition to | [S. 23] |
| तांदळाचा दाणा | kernel of rice | [S. 3(*gg*)] |
| तांदूळ | rice | [S. 14A] |
| तांदूळ सडणे | polishing rice | [S. 3(*d*)] |
| तूस | husk | [S. 14(*A*)] |
| त्वरेने | expeditiously | [S. 12(*2*)] |
| दखल घेणे | cognizance | [S. 15-m.n.] |
| नवीन भातगिरणी | new rice mill | [S. 3(*e*)] |
| नाराज झालेला | aggrieved | [S. 12(*1*)] |
| निगम-निकाय | body corporate | [S. 14-expl. (*a*)] |
| निर्देशन | reference | [S. 7] |
| निलंबित करणे | suspension | [S. 7-m.n.] |
| नूतनीकरण करणे | renew | [S. 6(*4*)] |
| पंपसंच | pumping set | [S. 3A] |
| परवाना | permit | [S. 5(*1*)] |
| परवाना मंजूर करणे | grant of permit | [S. 5(*1*)] |
| पाहणी करणे | inspection | [S. 9-m.n.] |
| पेढी | firm | [S. 14-expl.(*a*)] |
| प्रतिभूती म्हणून अनामत ठेवणे | deposit as security | [S. 7(*1*)] |
| प्रतिवेदने | returns | [S. 11-m.n.] |
| प्रतिस्थापन | replacement | [S. 5(*3*)] |
| प्रत्यायोजन | delegation | [S. 19-m.n.] |
| प्रत्याहृत करणे | revocation | [S. 7-m.n.] |
| प्रसीमा | precincts | [S. 3(*1*)] |
| प्राथमिक कृषि पत संस्था | primary agricultural credit Society | [S. 5(*5*)-expl. (i) (*c*)] |
| बंद पडलेली भातगिरणी | defunct rice mill | [S. 3(*a*)] |
| भरडाई यंत्र | sheller | [S. 5(4)(*d*)] |
| भात | paddy | [S. 3(*d*)] |
| भातगिरणी | rice-mill | [S. 3(*1*)] |
| भातगिरणी उद्योग | rice-milling industry | [S. 2] |
| भातघिरटी | rice huller | [S. 3A] |
| भातभरडाईच्या क्रिया | rice-milling operations | [S. 3(*a*)(*i*)] |
| भातभरडाईच्या क्रिया चालवणे | carry on rice milling operations | [S. 8(*2*)] |
| मालक | owner | [S. 3(*g*)] |
| मिळवणे | recover | [S. 14A] |

| | | |
|---|---|---|
| मूकानुमती | connivance | [S. 14(*2*)] |
| यंत्रसामग्री | machinery | [S. 3(*i*)] |
| लायसन | licence | [S. 6-m.n.] |
| लायसन अधिकारी | licensing officer | [S. 3(*c*)] |
| लोकसेवक | public servant | [S. 20-m.n.] |
| वास्तू | premises | [S. 3(*i*)] |
| विद्यमान भातगिरणी | existing rice mill | [S. 3(*b*)] |
| विधिग्राह्यता | validity | [S. 8-expl.] |
| विशोधित करणे | amendment | [S. 7-m.n.] |
| विहित | prescribed | [S. 3(*h*)] |
| व्यक्तिसंघ | association of individuals | [S. 14-expl.(*a*)] |
| व्यवस्थापक | manager | [S. 3(*g*)] |
| व्यवस्थापन एजंट | managing agent | [S. 3(*g*)] |
| व्यवस्थापन संचालक | managing director | [S. 3(*g*)] |
| शाबितीचा भार | burden of proof | [S. 14 A-m.n.] |
| शासकीय कंपनी | Government company | [S. 5(*5*)-expl.(*ii*)] |
| शेतकरी सहकारी संस्था | farmers' co-operative society | [S. 5(*5*)-expl.(*i*)] |
| संयंत्र | plant | [S. 3(*i*)] |
| संचालक | director | [S. 14-expl.(*b*)] |
| —स न्यूनकारी | in derogation of | [S. 23] |
| समपहरण करणे | forfeit | [S. 7(*1*)] |
| सरकारजमा करणे | confiscation | [S. 14B] |
| सर्वांगीण व संपूर्ण चौकशी | full and complete investigation | [S. 5(*4*)] |
| सहकारी संस्था | co-operative society | [S. 5(*5*)-expl.(*i*)] |
| सारभूत तथ्य | essential fact | [S. 7(*1*)(*a*)] |
| स्थळ | location | [S. 5(*2*)] |
| स्थानिक भाग | locality | [S. 5(*4*)(*a*)] |
| हलगर्जीपणा | neglect | [S. 14(*2*)] |
| हुकूमतदार | in charge | [S. 14] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई